# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३७७-२०२४** **दिनांक :- १०/१०/२०२४**

## "शेअर मार्केट मध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील ५,७२,८३२/-/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. तांडेल यांचे मोबाईलवर एक लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंक ओपन करुन त्यात नमुद केल्याप्रमाणे शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन रक्कमेची गुंतवणूक केली. तक्रारदार यांनी नफा झालेली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता कोणतीही रक्कम काढता येत नव्हती. त्यानंतर आपली आर्थिक फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने नोंद घेण्यात आली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १८४०-बी/२०२३ अन्वये.)**

नमूद तक्रारी अर्जाचे तसेच गुन्हयाचे अनुषंगाने संबंधीत बँकेसोबत वेळोवेळी पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम वेळीच संशयीत बँक खात्यांमध्ये गोठविण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांची रक्कम त्यांचे मुळ खात्यात जमा होणेकरीता **मा. न्यायालयात वेळोवेळी पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली एकुण ५,७२,८३२/- रक्कम मा. न्यायालयाचे आदेशाने तक्रारदार यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- Telegram Channel, facebook, Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसेच ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.
- आपली वैयक्तिक माहिती, बँकेची गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे, पोअं/प्रशांत बोरकर, मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**